CIDCO
WE MAKE CITIES

NEWS

SUNDAY TIMES OF INDIA, MUMBAI/NAVI MUMBAI
AUGUST 4, 2024

# Cidco: Don't fall prey to rumours of hsg sale

**Navi Mumbai:** The City and Industrial Development Corporation (Cidco) has appealed to prospective home-buyers to remain alert and not fall prey to the rumours being spread about affordable houses on offer in various mass housing schemes across Navi Mumbai. Cidco clarified that no such housing scheme has officially been launched for sale, as has been circulated on social media platforms. Cidco has urged the public to exercise caution and verify information through official channels in order to avoid confusion. Cidco is currently constructing affordable housing units under the Pradhan Mantri Awas Yojana (PMAY) in various parts of Navi Mumbai. "However, it is important to note that no official housing scheme has been launched for the sale of these units as of now. Cidco has observed that false information about the sale of its mass housing scheme is being spread on social media platforms. Hence, citizens are advised to be cautious and double-check information through official sources to avoid any misconstruction," said a Cidco spokesperson. — **BB Nayak**

CIDCO
WE MAKE CITIES

NEWS

सकाळ | मुंबई, सोमवार, ५ ऑगस्ट २०२४

# आंध्र प्रदेशला नवी मुंबईची भुरळ

## राजधानीच्या निर्मितीसाठी सिडकोला भेट

नवी मुंबई, ता. ४ : आंध्रप्रदेश राज्याकडून 'विकसित अमरावती' हे शहर राजधानी म्हणून विकसित करायचे आहे. या शहराचा नवी मुंबईच्या धर्तीवर नियोजनबद्ध विकास व्हावा, याकरीता आंध्रप्रदेशचे नगरविकास मंत्री डॉ. पी. नारायण गारू यांनी सिडकोला बुधावारी (ता. ३१) भेट दिली. त्यांच्यासोबत आंध्रप्रदेशचे नगरपालिका प्रशासन व नगरविकास विभागाचे अधिकाऱ्यांचे शिष्टमंडळ होते. गारू यांचे सिडकोचे व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल यांनी स्वागत केले.

नवी मुंबईतील प्रकल्पस्थळांना भेट दिल्यानंतर सिडको भवन येथे आंध्र प्रदेशच्या शिष्ट मंडळातील सदस्यांकरिता सिडकोच्या प्रकल्पांचे सादरीकरण करण्यात आले. याप्रसंगी सिडकोचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल, सहव्यवस्थापकीय संचालक शान्तनु गोयल, मुख्य दक्षता अधिकारी सुरेश मेंगडे, अतिरिक्त मुख्य नियोजनकार आशितोष निखाडे, वरिष्ठ नियोजनकार प्रांजली माने यांच्यासह अन्य अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. आंध्र प्रदेश शासनातर्फे तेथील अमरावती हे शहर राजधानीचे शहर विकसित करणे नियोजित आहे. या प्रकल्पांतर्गत शहरांतर्गत रस्ते, पाणीपुरवठा, मलनिस्सारण व्यवस्था, दळणवळण इत्यादी पायाभूत सुविधांसह सचिवालय, विधिमंडळ, उच्च न्यायालयाच्या इमारती विकसित करण्यात येणार आहेत. या सुविधांसह शासकीय गृहनिर्मितीही नियोजित आहे. या संदर्भात भौतिक व सामाजिक पायाभूत सुविधांनी परिपूर्ण स्वयंपूर्ण शहरे विकसित करण्याचा दीर्घ अनुभव असणाऱ्या सिडकोच्या नगर नियोजनातील प्रारूपांचा अभ्यास करण्याकरिता सिडकोच्या विविध विकास प्रकल्पांना भेट देण्याच्या अनुषंगाने आजच्या भेटीचे नियोजन सिडकोतर्फे करण्यात आले होते.